नवी मुंबई महानगरपालिका सर्वसाधारण सभेचा जाहिरात प्रसिद्ध करण्यासंदर्भातील दि.१९.०१.२०१८ रोजीचा ठराव क्र.१४१, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५१ (१) अन्वये प्रथमत: निलंबित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:- नमुंम-१२१८/प्र.क्र.४०/नवि-२८
मंत्रालय (मुख्य इमारत), ४ था मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २७ मे, २०१९

संदर्भ:- १) नवी मुंबई महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.१४१, दि.१९.०१.२०१८.
२) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.नमुंमपा/परवाना विभाग/३१६/२०१८, दि.२०.०२.२०१८.

प्रस्तावना:-

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सीबीडी, नेरूळ, वाशी व कोपरखैरणे येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांवरील जाहिरात फलकांवर जाहिरात प्रसिद्ध करण्यासाठी जाहिरात संस्थांना ठेका देण्याबाबत ऑनलाईन निविदा सूचना प्रसिद्ध करून, पात्र निविदाकार मे.वालोप ॲडव्हर्टायझिंग यांना ३ वर्षांसाठी कामाचा ठेका देण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीने ठराव क्र.११० व ठराव क्र.१११, दि.१५.०९.२०१७ अन्वये मंजूर केला आहे. सदर स्थायी समितीचा ठराव दि.१९.०१.२०१८ रोजी भरलेल्या सर्वसाधारण तहकूब सभेत (दि.१६.१०.२०१७ रोजीच्या सभेतील विषय क्र.३) ठराव क्र.१४१ अन्वये नामंजूर केला आहे.

२. नवी मुंबई महानगरपालिका सर्वसाधारण सभा दि.१९.०१.२०१८ अन्वये नामंजूर झालेला ठराव क्र.१४१ पुढीलप्रमाणे आहे:-

"उपरोक्त विषयासंदर्भात मे.वालोप ॲडव्हर्टायझिंग या कंत्राटदाराबरोबर ३ वर्षाच्या कालावधीसाठी किंवा सर्वंकष धोरण मान्य झाल्यास शहरासाठी राबविण्यात येणाऱ्या एकत्रित आर.एफ.पी. (Request for Proposal) नुसार जे अगोदर येईल, त्या कालावधीपर्यंत देण्यास रु.१३,२०,०००/- इतक्या खर्चाने कलम-७३ (ड) नुसार करार करण्यास, तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-७९ (क) व (ड) अन्वये मंजुरी देण्यात यावी."

३. यासंदर्भात आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी असे नमूद केले आहे की,

नवी मुंबई महानगरपालिकेने स्वखर्चाने सदर स्तंभ उभारलेले आहेत. त्यामुळे तेथे आरोग्य विभाग किंवा महानगरपालिकेच्या जाहिराती करण्यासाठी कायमस्वरुपी जागा असावी, म्हणून सदर प्रस्ताव मा.मासिक सर्वसाधारण सभेने नामंजूर केल्याचे इतिवृत्तामध्ये नमूद आहे. जाहिरात फलकांवर जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबतचे हक्क देण्याबाबतची निविदा प्रक्रिया नियमानुसार पार पडलेली आहे. जाहिरातीचे हक्क दिल्यास महापालिकेस त्यापासून उत्पन्न मिळणार आहे. त्यामुळे सदर ठराव महानगरपालिकेच्या आर्थिक हिताविरुद्ध असल्याने तो विखंडीत करण्यात यावा व प्रशासनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

४. नवी मुंबई महानगरपालिकेने त्यांचे कार्यक्षेत्रात जाहिरातींसाठी १) सीबीडी अग्निशमन केंद्र, २) नेरूळ, से.६ उद्यान, ३) वाशी विभाग कार्यालय आवार आणि ४) कोपरखैरणे बस डेपो आवारातील जाहिरात फलकांवर जाहिरात करण्याबाबतचे हक्क देण्याबाबतची ऑनलाईन निविदा प्रक्रिया पार पाडलेली आहे. तसेच एकूण चार पात्र निविदाकारांनी महापालिकेकडे ऑनलाईन निविदा सादर केल्या होत्या. पात्र निविदांमधून निविदा अटी/शर्तीची पुर्तता करणाऱ्या व जास्तीत जास्त वार्षिक देकार देणारे मे.वालोप ॲडर्व्हटायझिंग यांना ३ वर्षाकरिता जाहिरातींचे हक्क देण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-७९ (क) व (ड) अन्वये मा.स्थायी समितीची मान्यता मिळण्यासाठी सादर करण्यात

आला असता, स्थायी समितीने सदर निविदेस ठराव क्र.११० व ठराव क्र.१११ अन्वये मंजुरी दिलेली आहे. यापूर्वी सदर जाहिरात होर्डिंग्जपासून महानगरपालिकेला ऑनलाईन रु. ००.४८ लाख इतके वार्षिक उत्पन्न मिळत होते. नवीन निविदेनुसार प्रथम वर्षासाठी रु.३.३० लाख, द्वितीय वर्षासाठी रु.४.४० लाख व तृतीय वर्षासाठी रु.५.५० लाख याप्रमाणे एकूण तीन वर्षांसाठी रक्कम रु.१३.२० लाख इतके उत्पन्न महानगरपालिकेस मिळणार आहे.

५. उपरोक्त बाबी विचारात घेता, नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दि.१९.०१.२०१८ रोजी पारीत केलेला ठराव क्र.१४१ हा महानगरपालिकेच्या आर्थिक हिताविरुद्ध असल्याचे दिसून येत असल्याने सदर ठराव निलंबित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जाहिरात फलकावर जाहिरात प्रसिद्ध करण्यासाठी निविदा प्रक्रियेअंती पात्र निविदाकारास कामाचा ठेका देण्याबाबतचा" स्थायी समितीने मंजूर केलेला प्रस्ताव नामंजूर करण्याबाबत सर्वसाधारण सभेने पारित केलेला ठराव क्र.१४१, दि.१९.०१.२०१८ हा महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या विरुद्ध असल्याने, शासनास असलेल्या अधिकाराचा वापर करून, सदर ठराव अंतिमत: विखंडीत करण्यापूर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५१ (१) अन्वये प्रथमत: निलंबित करण्यात येत आहे.

२. सदर ठरावाच्या निलंबनाच्या शासन निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत संबंधितांनी अभिवेदन सादर करावे. सदर अभिवेदन विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५१ (३) नुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०५२८११४३१८५०२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Navnath Ravaji Wath

Digitally signed by Navnath Ravaji Wath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=885bfbac1d8ef74e3ffe622f226b31d75c2a13f319632f0da72fd54e57ac00ff, serialNumber=30e05bf6f1ed11d82b5689c9fc6b47a271a6b22790a9388dba7f3db15e247ff5, cn=Navnath Ravaji Wath
Date: 2019.05.28 11:47:18 +05'30'

(नवनाथ रा. वाठ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) महापौर, नवी मुंबई महानगरपालिका, जिल्हा-ठाणे.
३) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, जिल्हा-ठाणे.
४) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) निवडनस्ती (नवि-२८).